# समाजस्वास्थ्य

संपादक
र. धों. कर्वे, एम.ए.

वर्ष २५, अंक १० वा    १५ एप्रिल १९५२    किंमत ४ आणे



# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | कामस्वातंत्र्य आणि प्रजोत्पत्ति-१ ... | १८१ |
| २. | शास्त्रीबुवांशीं संवाद ... ... ... | १८६ |
| ३. | निसर्गोपचारांचा मूर्खपणा ... ... | १९१ |
| ४. | ग्रंथपरीक्षण ... ... ... ... | १९३ |
| ५. | पत्रव्यवहार ... ... ... ... | १९५ |
| ६. | शारदेचें पत्र ... ... ... ... | १९६ |



## अेजंटांचीं नांवें

**मुंबई** : श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें** : अेल्. के. जोशी, बुकसेलर.
डी. अेच्. शहा, बुकसेलर.

**अहमदनगर** : पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ

**निपाणी** : के. एस्. बळगुर्गी

**कुमठा** : आर्. एम्. कामत

**गोकाक** : पी. एम्. शिरगांवकर

**सांगली** : जी. अी. वसगडेकर.

**पत्रमैत्रीण पाहिजे.** पत्रव्यवहार मराठींतून. अिंग्रजींतूनही चालेल.
S c/o **समाजस्वास्थ्य.**

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# कामस्वातंत्र्य आणि प्रजोत्पत्ति–१

कामतृप्ति हा प्रत्येकाचा हक्क आहे, त्यांत पाप नाही, गुन्हा नाही, आणि प्रत्येकाला हा हक्क मिळवून देण्याचा अेकच मार्ग म्हणजे कामस्वातंत्र्य, म्हणजे दुसऱ्या कोणालाही त्रास न देतां ज्याला त्याला पाहिजे त्या मार्गाने आपली कामतृप्ति करून घेण्याची मोकळीक असणें, जरूर आहे हें आतांपर्यंत पाहिलें. पण केवळ तात्विक दृष्ट्या अेवढें सिद्ध केलें म्हणजे काम झालें, असें म्हटल्यास त्याचा व्यवहारांत कांही उपयोग होणार नाही. हें तत्व व्यवहारांत कसें आणावें याचा येथें विचार करणें जरूर आहे. जीवनांतील अनेक महत्वाच्या प्रश्नांशीं या तत्वाचा संबंध येतो, तेव्हां त्या प्रश्नांत या तत्वाचा कसा उपयोग करतां येअील हें पाहिलें पाहिजे.

प्रथम प्रजोत्पत्तीचा प्रश्न घेऊं. कामतृप्ति आणि प्रजोत्पत्ति या दोन वेगळ्या गोष्टी आहेत हें निसर्गानेच आपल्याला शिकवलें आहे, कारण प्रत्येक समागमाने कामतृप्ति होऊं शकते, परंतु त्यापासून निसर्गतः प्रजोत्पत्ति होतेच असें नाही. आणि स्वातंत्र्याचें तत्व लावतांना या निसर्गाच्या शिकवणीचा आपल्याला उपयोग होणार आहे.

मानवजाति जर नष्ट व्हायची नसेल, तर प्रजोत्पत्तीचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे यांत शंका नाही. पण प्रचलित क्लीबनीतींत याला बिलकुल महत्व दिलेलें नाही असेंच आपल्याला सर्वत्र आढळतें. पशूंचा समागम जसा

यदृच्छेने कोणाशींही होतो, त्यापासून प्रजा कशी होअील याची त्यांना फिकीर नसते, तशीच आतांपर्यंत माणसांची स्थिति आहे, कारण क्लीबनीतीचे जे निर्बंध आहेत, त्यांत सुप्रजाजननाचा विचार बिलकुल केलेला नसतो. हिंदूंमधें गोत्राचे व अितर धर्मांत नात्याचे जे निर्बंध आहेत, त्यांत सुप्रजाजननाचा संबंध नसतो. स्त्रीचा किंवा पुरुषाचा समागम फक्त अेकाच व्यक्तीशीं व्हावा, अितरांशीं होऊं नये, अेवढाच निर्बंध असल्यामुळें विवाहित जोडप्यापैकीं स्त्री किंवा पुरुष प्रजोत्पादनाला योग्य आहे की नाही हें कोण पाहतो? नपुंसक पतीपासून घटस्फोट कायद्याने मिळूं शकतो हें खरें, पण नपुंसक नसलेला पुरुष प्रजोत्पादनाच्या दृष्टीने योग्यच असतो असें नाही.

उलट ज्यांना जनावरांची पैदास करायची असते, ते प्रजोत्पत्तीला कोणतीं जनावरें लायक आहेत हें कसोशीने पाहतात, कारण पैदा झालेल्या जनावरांची किंमत या कसोशीवर अवलंबून असते. पण माणसें कशींही उत्पन्न झालीं तरी चालतात. स्त्रीपुरुषांना कितीही आणि कोणतेही रोग असले तरी प्रजोत्पत्तीसंबंधाने त्यांच्यावर कोणताच निर्बंध नसतो. अेकोणिसाव्या शतकापर्यंत सुप्रजाजननाचीं सामान्य तत्वेंही माहीत नव्हतीं, पण तीं माहीत झाल्यावर तरी माणसांच्या बाबतींत त्यांची पर्वा कोणीं केली आहे? पुष्कळ स्त्रियांना बाळंतपणाचे अगोदर व नंतर जरूर तितकी विश्रांति देखील मिळत नाही, मग समागमाचा योग्य काल कोण पाहणार? कोणत्याही कारणाने चेतना झाली म्हणजे समागम करायचा, अशीच सर्वांना संवय असते. मुलें होतील तशीं होतील, त्याला आपण काय करणार, अशीच बहुतेकांची वृत्ति अजून देखील असते.

बरें सरकारने अिकडे लक्ष द्यावें, तर विसाव्या शतकांतही कोणत्याही देशाच्या सरकारला युद्धाच्या दृष्टीने लोकसंख्या कशी वाढेल हीच काळजी असते. सरकार लोकांना सांगतें, अधिक मुलें उत्पन्न करा, मग तीं कशींही असलीं तरी चालतील. हिटलरसारख्यांना विवाहाच्या मर्यादेचीही पर्वा नव्हती, कारण तशी पर्वा केली तर यूरोपांत स्त्रियांची संख्या जास्त असल्या-

मुळें ज्या स्त्रियांना सक्तीनें अविवाहित रहावें लागतें, त्यांना मुलें न झाल्यास लोकसंख्या कशी वाढणार ? पण सामान्यतः विवाहाची मर्यादा पाळूं नका असें सरकारही उघडपणें सांगूं शकत नाही. युद्धांत मरायला औरस मुलें लागतात असें नाही, पण सरकारांनाही नीतीचें ढोंग करावें लागतें, यामुळें क्लीबनीति आणखी पसरते. या सर्वांचा परिणाम असा होतो की प्रजोत्पत्तीचा महत्वाचा प्रश्न शास्त्रीय दृष्ट्या सर्व प्रकारची काळजी घेऊन सोडवला जाण्याऐवजीं माणसांच्या बाबतींत पशूंपेक्षांही आपण कमी काळजी वाहतों आणि मुलें अजूनपर्यंत यदृच्छेनेच निर्माण होतात.

व्यक्तींकडे पहावें तर या प्रश्नावर विचार करून आपल्या कर्तव्याची दिशा फारच थोडे ठरवतात. कित्येकांना मुलांचा व्याप मुळींच नको असतो, यामुळें ते त्या भानगडींतच पडत नाहीत. कित्येकांना थोडींबहुत तरी मुलें पाहिजे असतात, पण राष्ट्राच्या अपेक्षांकडे ते लक्ष देत नाहीत, कित्येकांना कशाचीच पर्वा नसते आणि ते अितकी प्रजोत्पत्ति करतात कीं त्यांना मुलें नीटपणें वाढवण्याची शक्ति नसल्यामुळें त्यांचा भार समाजावर पडतो. त्यांत आणखी अनौरस मुलांची भर पडते आणि अशा मुलांना समाज कनिष्ठ समजत असल्यामुळें गर्भपात आणि बालहत्या यांचा सुळसुळाट होतो. यांविरुद्ध कायदे आहेत, पण समाजाच्या धाकामुळें या कायद्यांचा तिळमात्र उपयोग होत नाही.

हा सर्व कशाचा परिणाम आहे ? धर्मबाज आणि नीतिबाज लोकांनी क्लीबनीतीचा पुरस्कार करून या विषयाचा शास्त्रीय विचार करण्यास वावच ठेवला नाही व या बाबतींत बुद्धीचा उपयोगच कोणीं करीत नाही आणि समाजाचें हित कशांत आहे हें देखील कोणी पहात नाही. हा विषय अश्लील आहे, घाणेरडा आहे, ही समजूत पसरल्यामुळें त्याचा उघड खल करण्यासच कोणी धजत नाही आणि तो दाट अंधारांतून उजेडांत आणण्याचा कोणाला धीर होत नाही.

मिशेल कॉर्डे यांनी १९०४ सालीं लिहिलें आहे, ' लोकसंख्या फाजील वाढणें हेंच युद्धाचें मुख्य कारण आहे आणि अनिर्बंध प्रजोत्पत्तीमुळेंच मानवी प्राण्यांचीं बहुतेक दुःखें उत्पन्न होतातः हें सत्य जेव्हां लोक ओळखतील, तेव्हां अितर प्राण्यांच्या आणि वनस्पतींच्या पैदाशीबाबत जशी काळजी आज अनेक शतकांपासून लोक घेत आले आहेत, तशीच माणसांच्या बाबतींतही घेऊं लागतील. '

यानंतर कांही वर्षांनी अेच्. जी. वेल्स् यांनी अेका कादंबरींत अेकाच्या तोंडीं पुढील वाक्यें घातलीं आहेत. ( विसाव्या शतकाच्या आरंभीं ) ' अज्ञानाला दिलेल्या उत्तेजनामुळें मनुष्याचें जीवन सुखी कसें होअील याची अंधुक देखील कल्पना फारच थोड्यांना होती. माझ्या लहानपणीं प्रजोत्पादनावर निर्बंध ही गोष्ट कोणीं अैकली देखील नव्हती. विद्वान प्रोफेसर, धर्मोपदेशक, डाक्टर किंवा सरकारी अधिकारी, यांनी लोकांना संततिनियमन, रोगांचा प्रतिबंध, आणि अेकमेकांशीं सहकार्य कसें करावें, हें शिकवण्याअेवजीं ते अशा शिक्षणाला विरोधच करीत. ' ' लंडन शहरांत पंधरा मैलांच्या टापूंत ७५ लक्ष माणसें किड्यांसारखीं रहात होतीं, कारण मूल हा समागमांतला अपघात होता. ' त्याला कोण काय करणार, अशीच बहुतेकांची भावना होती. '

परंतु आपली लोकसंख्या कमी होत आहे अशी भीति जेव्हां अगदी अलीकडे पाश्चात्य देशांत उत्पन्न झाली, तेव्हां त्यांना या विषयाच्या शास्त्रीय अभ्यासाचें महत्व समजलें. अितर प्राण्यांच्या पैदाशींत जसा संख्या आणि गुण या दोन गोष्टींचा विचार करावा लागतो, तसाच माणसांच्याही बाबतींत तो केला पाहिजे, हें स्पष्ट दिसलें. या विषयाला 'सुप्रजाजनन' हें नांव मिळालें व त्याकडे लोकांचें लक्ष वेधलें. परंतु त्याच्या पुरस्कर्त्यांच्या मनांत देखील क्लीबनीतीच्या कृत्रिम कल्पना ठाण मांडून बसल्या होत्या आणि त्यांना हुसकून लावणें सोपें काम नव्हतें. समाजशास्त्राला शास्त्र म्हणतात खरें, परंतु तेथेंही या खोट्या कल्पनांनी धुडगुस घातला आहे आणि यामुळें त्यांतही शास्त्रीय विचाराला वाव मिळत नाही.

कामपूर्तीचा प्रत्येकाचा हक्क आणि त्याकरतां जरूर असणारें काम-स्वातंत्र्य, यांबद्दल आतांपर्यंत जें विवेचन केलें, त्यावरून अेक गोष्ट लक्षांत येते की कामपूर्ति आणि प्रजोत्पत्ति या दोन वेगळया गोष्टी आहेत. पहिली गोष्ट सुखाचें साधन आहे, आणि दुसरी कांही अंशीं कर्तव्यांच्या सदरांत येते.

प्राचीन काळींही प्रजोत्पत्तीचा विचार केलेला नव्हता असें नाही, पण त्या काळीं वेगवेगळया गटांनी जे दंडक ठरवले, ते केवळ स्वतःच्या गटाच्या हिताच्या दृष्टीने ठरवले होते, सर्व जगाचें हित कशाने होअील, हा विचारच त्या काळीं नव्हता. कांही ठिकाणीं ( उदाहरणार्थ पॉलिनीशिआमधें ) लोक-संख्या अन्नाच्या मानाने फाजील वाढत आहे असें दिसलें, तर गर्भपात आणि बालहत्या यांना ऊत येत असे. तेथील अेका राजाला यासंबंधी प्रश्न केला असतां तो म्हणाला की बालहत्त्या फक्त खालच्या दर्जाच्या लोकांतच आहे आणि ती नसती तर या बेटांत उत्पन्न होणारें अन्न सर्वांना पुरलें नसतें. ही कांहीतरी सबब नव्हती, कारण त्यांना दुसरा अिलाजच नव्हता. सर्व जनतेची उपासमार होण्यापेक्षां कांही मुलें जन्मतःच मेलेलीं बरीं, असें वाटणें साहजिक होतें.

प्राचीन ग्रीसमध्येंही रोगट मुलांना जगूं न देण्याची सरकारची सक्ती होती. कारण अशीं मुलें जगल्यापासून कोणताच फायदा न होतां अन्नाच्या बाबतींत अडचण मात्र होती. याउलट जे लढाऊ गट होते, त्यांत मृत्युसंख्या जास्त असल्यामुळें त्यांना शक्य तितकी प्रजा वाढायला पाहिजे असे आणि तसा प्रचार ते करीत असत. उदाहरणार्थ यहुदी लोकांचें आसपासच्या लोकांशीं नेहमी वैर असे, तेव्हां त्यांना स्वसंरक्षणाकरतां विपुल प्रजा पाहिजे असे आणि म्हणूनच त्यांच्या धर्मग्रंथांत विपुल प्रजोत्पत्ति करण्याचा आदेश आहे. आपल्याकडेही 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव,' हा जुना आशीर्वाद अशाच अर्थाचा आहे. हल्लींच्या दिवसांत आठ मुलें म्हणजे कोणालाही आपत्तिच वाटेल, पण त्या काळीं लोकसंख्या वाढायला पाहिजे होती. पण ती गरज संपल्यावर क्लीबनीति देखील त्याच यहुदी धर्मग्रंथांतून उपस्थित झाली, कारण सुखाला त्यांचा धार्मिक विरोध होता. या जगांत ज्यांना सुख मिळालें, त्यांना मर-

णोत्तर स्वर्गसुख मिळणार नाही, ही कल्पना आपल्याकडेही आढळते आणि या दृष्टीने पुष्कळ लोक आपले हाल करून घेत असतात. या जगांत ब्रह्मचर्य कां पाळायचें, तर स्वर्गांत अप्सरा मिळाव्या म्हणून. पण हें हातचें सोडून पळत्याच्या मागें लागण्यासारखें आहे, हें अशा बावळटांच्या लक्षांत येत नाही.

रोमसारख्या आक्रमक देशांत लोकसंख्या कमी होऊन चालणार नाही हें लक्षांत घेऊन तेथील बादशहा ऑगस्टस याने असा कायदा केला की पंचवीसपासून साठ वयाच्या सर्व पुरुषांनी आणि वीस ते पन्नास वयाच्या सर्व स्त्रियांनी लग्न केलें पाहिजे. विवाहितांना पुष्कळ प्रकारच्या सवलती दिल्या होत्या आणि ज्यांना जास्त मुलें होतील त्यांना आणखी सवलती होत्या. फ्रान्समध्येंही अगदी अलीकडे जास्त मुलें असलेल्या जोडप्यांना अनेक सवलती होत्या आणि अजूनही असतील, परंतु त्यापूर्वींच्या काळांत, म्हणजे मध्ययुगांत, प्रजोत्पत्ति इतकी जोराने होऊं लागली की इतक्या तोंडांना अन्न कसें पुरवावें, ही विवंचना सर्व पाश्चात्य देशांत उत्पन्न झाली. या परिस्थितीवर उपाय माल्थस नांवाच्या पाद्री संशोधकाने सुचवला.

---

# शास्त्रीबुवांशीं संवाद

शास्त्रीबुवा बऱ्याच दिवसांत भेटले नव्हते, पण आमची ओळख फार दिवसांची. चहा घेतां घेतां त्यांनी विचारलें, काय हो, तुम्ही नास्तिक कधींपासून झालांत?

**मी**—पहिल्यापासूनच नास्तिक आहें.

**ते**—पहिल्यापासून म्हणजे काय? उपजल्यापासून?

**मी**—उपजल्यापासून नव्हे, पण कांहीतरी समजूं लागल्यापासून. लहानपणीं पुराणांतल्या गोष्टी इतरांसारख्या मींही ऐकल्या आहेत, पण त्या विश्वास बसण्यासारख्या आहेत का? मारुति उपजल्याबरोबर सूर्याला खायला गेला, हें कोणाला खरें वाटेल का?

**ते**—श्रद्धा असली म्हणजे खरें वाटतें. हाच श्रद्धेचा उपयोग.

**मी**—श्रद्धा म्हणजे धडधडीत खोट्या दिसणाऱ्या गोष्टी खऱ्या मानायच्या, असेंच की नाही? याला श्रद्धा म्हणण्यापेक्षां मूर्खपणा कां म्हणूं नये?

**ते**—वा वा! अहो तुम्ही अितके शिकलांत, तरी तुम्हाला हें कसें माहीत नाही की 'श्रद्धावान् लभते ज्ञानं'?

**मी**—वा! म्हणजे खोट्या गोष्टी अगोदर खऱ्या मानायच्या आणि शिवाय त्यांना ज्ञान म्हणायचें! हें चांगलें ज्ञान आहे! याला मी मूर्खपणाचा कळस म्हणतों.

**ते**—अहो, हें भगवद्गीतेंतलें वाक्य आहे, तें खोटें कसें असेल?

**मी**—जशीं बाकीचीं खोटीं आहेत, तसेंच हें.

**ते**—प्रत्यक्ष श्रीकृष्णाला तुम्ही खोटा म्हणतां?

**मी**—मग त्यांत काय झालें? मी नास्तिक आहें हें तुम्हाला माहीतच आहे.

**ते**—मग तुम्ही सिद्ध करा पाहूं अीश्वर नाही म्हणून.

**मी**—शास्त्रीबुवा, तुम्ही तर्कशास्त्र कधीं शिकलां आहांत का?

**ते**—अर्थात् शिकलों आहें.

**मी**—पण त्यांतलें कांही कळलें आहे का तुम्हाला?

**ते**—अलबत् कळलें आहे.

**मी**—बरें, तुम्ही कधीं चोरी केली आहे का?

**ते**—अहो, काय विचारतां हें? मी चोरी कसा करीन?

**मी**—नाही केलीत ना? तर मग तें सिद्ध करा पाहूं.

**ते**—तें कसें सिद्ध करतां येअील? पण मी केलीच नाही मुळीं.

**मी**—मग अीश्वर नाही हें तरी कसें सिद्ध करतां येअील?

**ते**—मग तुम्ही अीश्वर नाही हें कशावरून म्हणतां?

**मी**—अीश्वर नाही असें मीं म्हटलेंच नाही, कारण त्या वाक्यांत 'अीश्वर' हा शब्द येतो आणि त्याची कांही व्याख्याच नसल्यामुळें त्याला

कांही अर्थ नाही. असें निरर्थक वाक्य मी कां म्हणेन ?

**ते** – पण मग तुम्ही नास्तिक कसे ?

**मी**—तुमच्यासारखे लोक ओश्वराविषयीं ज्या गप्पा मारतात, त्यांना कांही पुरावा नसल्यामुळें त्यांच्यावर बिश्वास ठेवणें अशक्य होतें. अेवढाच नास्तिक याचा अर्थ.

**ते**—श्रीकृष्णाने भगवद्गीतेंत प्रत्यक्ष सांगितलें आहे की सगळें जग मीच उत्पन्न केलें आहे, अितकेंच नव्हे तर जगांतली प्रत्येक वस्तु म्हणजे माझेंच रूप आहे.

**मी**—अशा गप्पा मारणारे लोक तुम्हाला वेड्यांच्या अिस्पितळांत पुष्कळ सांपडतील.

**ते**—पण त्याने अर्जुनाला प्रत्यक्ष विश्वरूपदर्शन दिलें.

**मी**—अहो प्रत्यक्ष काय, अन् परोक्ष काय ? महाभारत नांवाच्या कादंबरींतल्या या गोष्टी आहेत. कादंबरींतलीं अद्भुत वर्णनें खरीं का मानायचीं असतात ?

**ते**—वा, आपल्या धर्मग्रंथांना तुम्ही कादंबऱ्या म्हणतां ? म्हणजे तुम्ही आपले अगदींच ...

**मी**—हो, मी आपला अगदींच आहें, पण दोन सैन्यांच्या मधें श्रीकृष्ण उभा राहून अर्जुनाला अेक व्याख्यान देतो आणि त्याच्या शंकांचें समाधान न करतां आल्यामुळें त्याला विश्वरूप दाखवतो, या गोष्टी तुम्हाला खऱ्या वाटतात हेंच आश्चर्य आहे. हें कादंबरींतच शक्य आहे, खऱ्या जीवनांत नाही.

**ते**—आतां काय सांगावें तुम्हाला ? अहो, याकरतांच श्रद्धा लागते. पण तुमच्यासारख्या नास्तिकांना काय सांगायचें आहे ?

**मी**—श्रद्धा हीच मनुष्याच्या मार्गांतली धोंड आहे. आजकालच्या जगाला जें ज्ञान मिळालें आहे, तें श्रद्धेने नव्हे, तर ' असें कशावरून ? असें कां होतें ? ' अशा प्रश्नांचा पिच्छा पुरवल्याने मिळालेलें आहे आणि त्याचा

तुम्हाला सुद्धां उपयोग होतो, शास्त्रीबुवा. विजेचे दिवे कांही अीश्वराने लावले नाहीत, माणसांनी लावले. आणि सगळें कांहीं अीश्वराच्या मर्जीनें होतें म्हणणारांना ज्ञान मिळावें कसें ?

**ते** —मग कशाने होतें ?

**मी** —सृष्टीच्या नियमांप्रमाणें सगळें जग चालत असतें असा अनुभव आहे.

**ते**—पण ते नियम केले कोणीं ?

**मी**—त्यांना नियम म्हणूं नये पाहिजे तर. सर्व पदार्थांच्या अंगांत जे विशिष्ट गुण असतात, त्यांच्यामुळें सृष्टींतील कार्यें होतात असें म्हणूं.

**ते**—हो, पण ते गुण तरी कसे आले ? अगोदर जगच कोठून आलें ? तें कोणींतरी निर्माण केलें असेल की नाही ?

**मी**—असें जर मानलें तर अीश्वराला कोणीं निर्माण केला ? तो जर स्वयंभू मानला, तर जगच स्वयंभू कां मानूं नये ? अन् अीश्वर मानावाच कशाला ? शास्त्रज्ञांना तो कोठेंच दिसत नाही, कारण सृष्टीचे नियम आपल्याला समजले म्हणजे असें दिसतें की ते अटळ असतात, त्यांत कोठेही फरक होत नाही.

**ते**—पण अशी व्यवस्था काय आपेआप होअील ? पदार्थांच्या अंगचे गुण काय आपोआप येतील ?

**मी**—आपोआपच येतात. अेक उदाहरण देतों. भूमितीचा असा सिद्धांत आहे की कोणतेही तीन बिंदु घेतले, तर त्यांतून जाणारें एक वर्तुळ आपल्याला काढतां येतें. हा गुण अीश्वराला देखील बदलतां येणार नाही, मग तो त्याने उत्पन्न केला असें कसें म्हणतां येअील ? असेच सर्व वस्तूंचे गुण अपरिहार्य आहेत. येथें अीश्वराचें काय काम ?

**ते**—पण जग उत्पन्न कोणीं केलें ?

**मी**—शास्त्रज्ञांचा असा सिद्धांत आहे की कोणतीही वस्तु नवीन उत्पन्न करतां येत नाही, किंवा असलेल्या वस्तूचा नाशही करतां येत नाही,

तिच्या फक्त स्वरूपांत फरक होऊं शकतो. तुमच्या म्हणण्याप्रमाणें प्रथम कांहीच नव्हतें, आणि मग ईश्वरानें स्वतःला उत्पन्न केला आणि मग जग उत्पन्न केलें. असेंच की नाही ?

**ते**—नाही, प्रथम अेकटा ईश्वर होता, आणि मग त्याने जग उत्पन्न केलें.

**मी**—हा अेकटा ईश्वर आला कोठून ? त्याला कोणीं उत्पन्न केला ? आणि दुसरें कांहीच नसतांना त्याने जग कसें उत्पन्न केलें ? अहो, घर बांधायला विटांसारखें कांही सामान लागतेंच ना ?

**ते**—ईश्वराला नाही लागत. केवळ अिच्छामात्रेंकरून त्याला पाहिजे तें उत्पन्न करतां येतें.

**मी**—हें आमच्या कल्पनाशक्तीच्या पलीकडे आहे. जादूगार अशा कांही गोष्टी करतो, पण ती फसवणूक असते. ईश्वराच्या बाबतींत तुम्ही त्या खऱ्या मानायला सांगतां. हें व्हावें कसें ?

**ते**—याकरतांच श्रद्धा लागते. तुमच्यासारख्यांना नाही तें जमायचें.

**मी**—आणि तुम्हाला त्या खोट्या वाटत असतांनाही तुम्ही खऱ्या म्हणतां, असेंच की नाही ? पण आम्ही न पटणाऱ्या गोष्टी कां मानाव्या ? आम्ही बुद्धिवादी आहोंत, पटेल तेवढेंच मानतों.

**ते**—यालाच अहंकार म्हणतात. नास्तिकांना तें नाहीच कळायचें.

**मी**—आणि तुम्हाला तरी कळतें आहे थोडेंच ? खोट्या गोष्टी खऱ्या म्हणणें म्हणजे कांही कळणें नव्हे.

**ते**—तुमच्यासारख्या नास्तिकांजवळ बोलूं सुद्धां नये.

**मी**—आलांत का आपल्या पालुपदावर ? त्याचीच वाट पहात होतों मी. बरें नमस्कार.

---

# निसर्गोपचारांचा मूर्खपणा

कित्येक लोक भाविकपणाने निसर्गोपचारांचा पुरस्कार करीत असतात, पण थोडा विचार केल्यास हें सहज कळण्यासारखें आहे की हा निसर्गावरील अंधविश्वास म्हणजे केवळ धार्मिक वेडगळपणा आहे. मरहूम महात्मा गांधी धार्मिक होते, म्हणूनच त्यानी निसर्गोपचारांच्या वेडगळपणाला पाठिंबा दिला आणि अर्थातच त्यांचे अनुयायी त्यांच्या मागोमाग गेले.

ही धार्मिक भावना असें धरून चालते की मनुष्य हें निसर्गाचें आवडतें लेकरूं आहे आणि निसर्गाप्रमाणें चालणाऱ्या माणसांना कधीं रोग होणें शक्य नाही. अीश्वराच्या आज्ञा मोडणारांना अीश्वर शिक्षा करतो, त्याचप्रमाणें निसर्गाच्या आज्ञ मोडणारांना निसर्ग शिक्षा करतो आणि ही शिक्षा म्हणजेच रोग. पण हा केवळ मूर्खपणा आहे.

जे धार्मिक नाहीत, त्यांना हें सहज दिसलें पाहिजे की निसर्ग ही कोणी व्यक्ति नाही आणि तिची कोणावरही कृपा असणें शक्य नाही, कारण कृपा हा शब्द व्यक्तींनाच लावतां येअील. निसर्गाचे नियम म्हणजे निसर्गाने केलेले नियम नव्हत, तर ज्या नियमांप्रमाणें जगांतले सर्व व्यवहार चालतात असें आपल्याला आढळतें, आणि जे आपल्याला नुकतेच थोडेबहुत कळूं लागले आहेत, त्या नियमांच्या समूहाला आपण निसर्ग हें नांव देतों. निसर्ग हा अेक सोयीचा शब्द आहे, यापलीकडे कांही नाही. या नियमांचा आपल्याला कधीं-कधीं फायदा घेतां येतो, अितकेंच. निसर्गाचे नियम कोणाला मोडतांच येत नाहीत, तेव्हां ते मोडूं नये या म्हणण्याला कांही अर्थच नाही. अमुक केलें तर अमुक परिणाम होअील, अशा स्वरूपाचे हे नियम असतात. अमुक करावें किंवा करूं नये, असे नसतात.

मनुष्य हा निसर्गाचा लाडका नाही. अितर प्राण्यांप्रमाणेंच तो अेक आहे. फरक अितकाच की तो निसर्गाच्या कांही नियमांचा उपयोग करून घेण्यास शिकला आहे आणि यामुळें त्याने कांही प्रमाणांत निसर्गावर सत्ता मिळवली आहे असें आपल्याला वाटतें, परंतु भूकंपासारख्या आपत्तींविरुद्ध

आपल्याला अजून कांहीं करतां येत नाही.

मनुष्याला रोग होतात, तेही निसर्गाच्या नियमांप्रमाणेंच होतात, कारण या नियमांच्या बाहेर कांहीं होणेंच शक्य नाही. हे नियम जाणून घेऊन मनुष्यानें रोग होणार नाहीत असा प्रयत्न करावा हें ठीक आहे. निसर्गाच्या नियमांप्रमाणें न चालल्यामुळें रोग होतात, ही कल्पना हास्यास्पद आहे, कारण अितर प्राणी आणि वनस्पति तर निसर्गाचे नियम मोडतात असें म्हणतां येणार नाही? तरीपण त्यांनाही रोग होतात. ते कां होतात? तेव्हां निसर्गाचे नियम मोडल्यामुळें रोग होतात ही कल्पना मूर्खपणाची आहे. झाडें बागेंतील असोत की अरण्यांतील असोत, अितर प्राणी माणसाळलेले असोत की रानटी असोत, त्यांना रोग झाल्याशिवाय रहात नाही. हें सत्य आहे, पण श्रद्धेपुढें सत्य काय करणार? खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवणें याचेंच नांव श्रद्धा. फक्त खऱ्याच गोष्टींवर विश्वास ठेवणारा बुद्धिवादी होय, श्रद्धाळू नव्हे.

अीश्वर दयाळू आहे, त्याची पूजा न केल्यामुळें आपल्यावर संकटें येतात, हा धार्मिक विश्वास आहे, सत्य नव्हे. तसेंच निसर्गापासून दूर गेल्यामुळें रोग होतात हें म्हणणें खरें नाही, ती केवळ धार्मिक श्रद्धा आहे. कांही धर्म जसे अीश्वरावर आधारलेले असतात, तसाच निसर्गाच्या आधारानें अेक धर्म बनला आहे. निसर्गाला कांही लोकांनी अीश्वराचें स्थान दिलें आहे, पण निसर्गाचें आस्तित्व अीश्वराअितकेंच काल्पनिक आहे. अीश्वर हा जसा केवळ अेक शब्द आहे, तो कोणत्याही वस्तूचा निदर्शक नाही, तसाच निसर्ग हा अेक शब्द आहे, त्याला अस्तित्व नाही. निसर्ग म्हणजे आरोग्य, आनंद, उत्साह, असें कित्येक मानतात, पण निसर्गाला हे शब्द माहीत नाहीत. निसर्ग दयाळू नाही क्रूर नाही, आनंदी नाही, दुःखी नाही, चांगला नाही आणि वाअीटही नाही. तो अेक सोयीकरतां बनवलेला शब्द आहे, यापेक्षां जास्त कांही नाही.

आपल्याला आनंद देणारीं झाडें, फुलें, नद्या, आणि झरे जसे निसर्गांत आहेत, तसेच सहारासारखीं वाळवंटें, ज्वालामुखी पर्वत, हेही निसर्गांतच आहेत. आपल्या अपत्यांची ममतेनें जोपासना करणारे प्राणी जसे निसर्गांत

आहेत, तसेच स्वतःचीं पोरें देखील निमीं शिम्मीं खाऊन टाकणारे प्राणी देखील निसर्गांत आहेत. संभोगानंतर नराला खाऊन टाकणाऱ्या कोळ्यासारख्या प्राण्यांच्या माद्या देखील निसर्गांतच आहेत. कांही नर केवळ संभोगाने प्रजोत्पत्ति करण्यापुरतेच जगतात आणि त्यांना अन्न खाण्याला तोंड देखील नसतें, कारण त्यांना लगेच मरून जायचें असतें. दुसऱ्याच्या शरीरांत शिरून त्याचें रक्त खाणारे जंतु निसर्गांतच आहेत. कित्येक प्राणी केवळ मरून जाण्याकरतांच जन्म घेतात, असें असतांना निसर्ग म्हणजे आनंद, निसर्ग म्हणजे आरोग्य, या वेडगळ प्रलापावर कोण विश्वास ठेवील? असंख्य मुलें अेक वर्षाच्या आंत मरून जातात, त्यांनी निसर्गाविरुद्ध कोणतें पाप केलेलें असतें हें कोणी सांगेल काय?

आणि निसर्गोपचार काय असतात हें पाहिलें, म्हणजे त्यांना हें नांव कां यावें हाही प्रश्नच पडतो. शरीरावर मातीचा लेप करणें, पोटांत वरून खालून रबराच्या नळ्या घालणें, उठल्या सुटल्या उपोषण करणें, या उपायांना नैसर्गिक कां म्हणावें? अॅलोपॅथी, होमिओपॅथी, आयुर्वेद, युनानी, अशा अेखाद्याच पद्धतीला खरी म्हणून बाकीच्या कुचकामाच्या ठरवणें, हाही वेडगळपणाच आहे. जेथें जी पद्धत लागू पडेल तेथे ती वापरावी, हाच शहाणपणाचा मार्ग आहे. मुख्य उद्देश रोग होऊं न देणें, व तें नच जमल्यास योग्य ते उपचार करणें, हाच असला पाहिजे, मग पद्धत कोणतीही असो. कोणत्याही पद्धतीचा धर्म होऊं देतां कामा नये.

# ग्रंथपरीक्षण

**गारंबीचा बापू.** लेखक, श्री. ना. पेंडसे. प्रकाशक, मौज प्रकाशन लिमिटेड, खटाववाडी, मुंबई–४, पृ. २५२, किंमत ५॥ रु.

'अेल्गार' व 'हद्दपार' या दोन उत्कृष्ट कादंबऱ्यांमुळें प्रसिद्धीस आलेल्या लेखकाची ही तिसरी कादंबरी आहे. त्या कादंबऱ्यांप्रमाणेंच हीही हर्णै बंदरच्या आसपासच्या प्रदेशाशींच संलग्न आहे. स्थलवर्णनासंबंधी लेखकाने प्रस्तावनेंत जें लिहिलें आहे की, 'स्थलवर्णनांमुळें कादंबरीच्या मोठेपणांत जी

काय भर पडत असेल, ती फारच मर्यादित स्वरूपाची असते ', त्याशीं आम्ही सहमत आहों आणि स्थलवर्णनाचा मोह लेखकाने या कादंबरींत बऱ्याच अंशीं टाळला आहे. प्रसंगाला पोषक असतील तेवढ्यापुरतींच अशीं वर्णनें असावीं, हें पुष्कळांना कळत नाही. हीही कादंबरी उत्कृष्ट आहे, किंबहुना वरील दोन्ही कादंबऱ्यांपेक्षां ही सरस ठरेल. पुस्तक वाचून होईपर्यंत खालीं ठेववत नाही आणि ती वाचतांना कोणाच्याही डोळ्यांतून टिपें आल्याखेरीज राहणार नाहीत. या कादंबरींत कांही अपरिचित, परंतु आमच्या दृष्टीने समंजस, मतें मांडण्याचा धीर लेखकाने केला आहे, याबद्दल त्यांचें अभिनंदन करावेंसें वाटतें. उदाहरणार्थ यांत अेक ब्राह्मणाचा मुलगा व अेक गुरवाची विधवा, लग्न लावायला कोणी भट मिळणार नाही म्हणून तशींच अेकत्र राहतात. ती गरोदर होते तेव्हां तिला भीति वाटते, तिचें समाधान करण्याकरतां बापू सूर्यनारायणाला साक्ष ठेवून गांधर्व विवाहाचें अेक सोंग करतो. त्याच गुरविणीच्या तोंडांत जे विचार घातले आहेत, त्यासंबंधी बापू तिला म्हणतो ' तुझ्या या मताप्रमाणें आपा दामले नुसता तबला वाजवून श्रेष्ठ ठरतात, आणि उपास करून, भिक्षा मागून राहणारे बागुलबुवा–त्यांचें जगणें निरर्थक वाटूं लागतें. वरवर पाहिलें की हंसू येतें आणि विचार करूं लागलें की तथ्य आहे असें वाटूं लागतें. जग सुखी करण्याकरतां जो धडपडतो तो मोठा ' अशा प्रकारचे विचार बहुजनसमाजाला सध्यां न पटले तरी कोणीतरी मांडायला पाहिजे होते आणि ते या लेखकाने मांडले आहेत. असेच आणखीही विचार यांत आहेत. ते निबंधांत असले तर फारसे लोक वाचीत नाहीत, पण आकर्षक कादंबरींत असले म्हणजे पुष्कळ वाचतात. अेकंदरींत प्रचाराने कला धोक्यांत येते असें जरी आमचें मत असलें, तरी हा प्रत्यक्ष प्रचार नाही, गोष्टीच्या ओघांत हे विचार सहज आलेले आहेत, म्हणून कलेला बाध येत नाही आणि या कादंबरीचें आकर्षण त्यामुळें कमी होत नाही. प्रादेशिक भाषेमुळें कित्येकांना सर्वच शब्द समजणार नाहीत, याकरतां तळटिपा देणें अिष्ट आहे असें वाटतें.

र. धों. कर्वे

---

# पत्रव्यवहार

१. वीर्य किंवा रेत यांचे रासायनिक घटक कोणते ? म्हणजे रासायनिक पृथक्करण केल्यास त्यांत कोणतीं रासायनिक द्रव्यें सांपडतात ? २. वरील प्रश्नाच्या अनुरोधानें वीर्याचा किंवा रेताचा होणारा खर्च भरून काढण्यासाठीं आहारांत कोणत्या अन्नांचा समावेश केला पाहिजे ? ३. संभोगाचे वेळीं पिशव्या वापरल्यानंतर त्या साध्या पाण्याने धुवून वाळवून ठेवल्यास हरकत नाही ना ? धुण्याची पद्धत म्हणजे पाण्यामध्यें खळबळून काढणें व उलट करून साफ करणें, हीच ना ? असें करून मग दुसऱ्या शुद्ध पाण्यांत कांही तास बुडवून ठेवल्यास पिशव्यांच्या टिकाऊपणावर कांही परिणाम होणार नाही ना ? ४. तसेंच स्त्रीला रोग असल्यास पिशवी जंतुविरहित करण्याकरतां काय करावें ? वर लिहिल्याप्रमाणें साध्या पाण्याने धुतल्यास चालेल काय ?

आपला अेक ग्राहक.

उ. सर्वच प्रश्नांस येथें उत्तरें देतां येत नसल्यामुळें अेक प्रश्न गाळला आहे. १ व २. हे घटक समजल्याने कांही विशेष फायदा होअील असें नाही व ही माहिती आम्हास कोठें सांपडली नाही. तथापि रेतांत विशेष महत्वाचा पदार्थ फॉस्फरस हा असतो. तो दूध, अंडीं, व बदाम यांत प्रामुख्याने सांपडतो. अेकंदरींत प्रकृति चांगली राहण्याकरतां जो आहार लागतो, त्याच आहाराने हेंही काम होतें व अशा प्रकारची माहिती आमच्या ' आधुनिक आहारशास्त्र ' या पुस्तकांत दिली आहे. ३. धुतांना साबण लावावा व स्वच्छ धुतल्यानंतर त्यांवर फ्रेंच चॉक किंवा दुसरी कोणतीही पूड ( पावडर ) टाकून कोरड्या करून ठेवाव्या. पाण्यांत बुडवून ठेवण्यांत कोणताही फायदा नाही. ४. रोगांचा संशय असल्यास पाण्यांत थोडें ' पोटॅशिअम परमँगनेट ' टाकून त्याने धुवावें, त्यानें जंतु मरतात. या औषधाचें प्रमाण ८ औंस पाण्यांत अेक ग्रेन अितकें असावें. **सं.**

---

# शारदेचें पत्र

येथल्या ‘ नवभारत ’ च्या ‘ अवि ’ ने अेका अंकांत ‘ माणिक मोतीं ’ या सदराखालीं अश्लीलतेवर अेक प्रवचन केलें आहे आणि त्याचा निष्कर्ष असा काढला आहे की नग्न किंवा अर्धनग्न स्त्रीचें वर्णन करणारे कवि, किंवा अशीं चित्रें रेखाटणारे चित्रकार किंवा पुतळे करणारे मूर्तिकार, हे सगळे अतृप्ततेमुळें विकृत झालेले असतात. अेकंदरींत या सगळ्या प्रवचनांत अितक्या चुकीच्या कल्पना ठेंचून भरल्या आहेत की तितक्या अितर कोठें अेकत्र सांपडणें कठिण.

या लेखकाची सौंदर्याविषयीं कल्पनाच कांही विचित्र आहे. त्यांचें म्हणणें असें की जीवनांत सौंदर्याचा अविष्कार करण्यासाठीं माणसांनीं कपडे तयार केले. पूर्वी जे लोक नग्न रहात असतील, त्यांनी कपडे घातले म्हणजे तें नावीन्य होअील आणि नावीन्यांत आकर्षण असतें हें खरें. पण सर्वच लोक कपडे घालूं लागल्यावर त्यांत नावीन्य रहात नाही आणि आकर्षणही नाही. शिवाय नग्न शरीरांत सौंदर्य नसतें आणि तें कपड्यांत असतें, असें म्हणणाराला सौंदर्याची खरी कल्पनाच कळलेली नाही असें म्हणणें भाग आहे. सौंदर्याची कल्पना कामुक आकर्षणांतून निघालेली आहे असें अनेक तज्ञांचें मत आहे. अेका फ्रेंच लेखकाने लिहिलें आहे की बेडकाला जगांतलें सर्व सौंदर्य बेडकीच्या ठायीं अेकवटलेलें दिसतें. अेखादा बेडूक कवि असता, तर त्याने बेडकीच्या शरीराचें वर्णन केलें असतें. याच कारणाने कवि पुरुष असेल तर तो स्त्रीच्या नग्न शरीराचें वर्णन कां करणार नाही? अर्थात् कवयित्रींनी पुरुषांच्या शरीराचें करणें साहजिक होअील, पण स्त्रिया अजून साहजिक वागणुकीला लाजतात अितकाच त्याचा अर्थ आहे.

समागम पाप मानणें आणि या आधारावर मनुष्याचीं कांही अिंद्रियें (मनुष्य हा अेकटाच प्राणी अश्लील आहे, बाकीचे प्राणी नागवे राहिले तरी माणसाला ते अश्लील दिसत नाहीत) आणि त्यांचीं कार्यें अश्लील ठरवणें, हें क्लीबनीतीचें अेक अंग आहे. यहुदी व खिस्ती धर्म प्रचलित होण्यापूर्वी,

उदाहरणार्थ प्राचीन ग्रीक व रोमन लोकांत ही कल्पना बिलकुल नव्हती आणि त्या लोकांत समागम हें पाप नव्हतें, व गणिकांना फार मोठा दर्जा होता. तेव्हां अशा वेळीं अतृप्तीमुळें येणारी विकृति ही अशक्य होती, कारण हल्लीचे निर्बंध तेव्हां नव्हते. पण तरी देखील त्या काळच्या चित्रकारांनी नग्न चित्रांची आणि मूर्तिकारांनी नग्न पुतळ्यांची रेलचेल करून दिली होती. ही जर विकृतीची खूण असती, तर हें अशक्य होतें. शरीराला अश्लील मानणें हीच विकृति आहे आणि तीमुळें लेखकाची सौंदर्याची कल्पना सुद्धां विकृत झाली आहे, हें यावरून उघड दिसतें. चित्रकारांची परंपरा अजूनही चालू आहे आणि जगांत असा अेकही नांवाजलेला चित्रकार किंवा मूर्तिकार सांपडणार नाही की त्याने नग्न शरीर दाखवलें नाही. कोणतेंही चित्रांचें प्रदर्शन पहा, त्यांत नग्न चित्रें नाहींत हें शक्यच नाही. जो नग्न चित्र काढायला लाजतो, तो खरा चित्रकारच नव्हे, अितकेंच नव्हे तर चित्रकलेचें शिक्षण घेतांना प्रत्यक्ष नग्न माणसांवरून चित्रें काढायला शिकवतात. हे चित्रकार आणि मूर्तिकार विकृत म्हणणें म्हणजे दुराग्रहाची शिकस्त झाली!

त्याच अंकांत कालेजांतल्या दोन मुलींची चित्रें आणि नांवें देऊन असें लिहिलें आहे की त्या दोघींची अेकाच माणसाशीं लग्न करण्याची अिच्छा आहे. हल्लीचा कायदा लक्षांत घेतला तर मला वाटतें ही बदनामी होते. असुक मनुष्य चोरी करूं पहात आहे असें म्हटलें, तर ती बदनामी नाही का होणार? मला सुद्धां द्विभार्याप्रतिबंधक कायदा पसंत नाही, पण कोठलाही वाअीट कायदा देखील मोडायची असुक माणसाची तयारी आहे म्हणणें म्हणजे सरळ बदनामी आहे. असे लेख आणि चित्रें हे संपादक कां छापतात हें मला कळत नाही. तेवढा अेखादा अंक जास्त खपेल अदाचित्, पण अेकंदरींत हें बरें नव्हे असें मला तर वाटतें.

पंडित नेहरू आहेत खूप हुशार, पण अेखादे वेळीं ते आचरटासारखें बोलतात. वार्ताहरांना त्यांनी सांगितलें म्हणे, की मुरारजी निवडणुकींत पडले म्हणून काय झालें? लाखों लोकांना ते पाहिजे आहेत. पाहिजे असतील, पण

लाखों लोकांना ते नको आहेत हें सुद्धां तितकेंच खरें आहे. याचा अर्थ अेकच दिसतो की नेहरूंना ते पाहिजे आहेत. त्यांना दारूबंदीच्या प्रांतांत रहावें लागलें असतें, तर कदाचित् त्यांचें मत बदललें असतें, पण मुरारजी कांही दिल्लींत दारूबंदी करीत नाहींत, तेव्हां त्यांना मुरारजींबद्दल जिव्हाळा वाटतो. म्हणून ते म्हणतात, ' केवळ अेका मतदारसंघाने त्यांना नाकारलें म्हणून लायक आणि कार्यक्षम माणसांना कोणतीच मोठी जागा देऊं नये काय ? निवडणुकींत पराभव झालेल्यांना आपण वगळींत गेलों तर त्यांनी कोठें जावें ? नेहरूंची अशी कल्पना आहे का, की सगळीं कार्यक्षम माणसें कांग्रेसमधें आहेत ? दुसऱ्या पक्षांतलीं पडलेलीं माणसें घ्यायची त्यांची तयारी आहे का ? शिवाय कार्यक्षम माणसें नेहमी निवडणुकींना उभीं राहतात असें थोडेंच आहे ? नेहरूंच्या म्हणण्याचा अर्थ असा होतो की निवडणुकींत जय होवो की पराजय होवो, नेहरूंना जीं माणसें कार्यक्षम वाटतील, त्यांची वर्णी कोठेतरी लागलीच पाहिजे. मग असा अेक कायदा कां करीत नाही की नेहरूंना कार्यक्षम वाटणाऱ्या माणसांची अेक यादी करून तीं निवडून आलीं असेंच समजावें ? मग निवडणुकींत अर्थ काय राहिला ? या यादींतले लोक पडले काय किंवा जिंकले काय, त्यांची सोय व्हायचीच. पडलेल्यांनी काय करावें, याच्या उठाठेवी नेहरूंना कशाला ? त्यांनी काय वाटेल तें करावें. घरीं स्वस्थ बसावें, किंवा नोकरी पाहिजे असली तर अितर लोकांसारखे अर्ज करीत रहावें. त्यांची काळजी करण्याचें नेहरूंना काय कारण, अन् नेहरूंना पाहिजे असलेल्या, अन् लोकांना नको असलेल्या लोकांची आपत्ति लोकांनी कां सहन करावी ? लोकशाहीचा कंठशोष करून पुरस्कार करणाऱ्या नेहरूंना हें शोभत नाही. लोकशाहीची त्यांना बिलकुल पर्वा नाही असा याचा अर्थ आहे.

माध्यांनी सावकारांना लिहिलेलें अनावृत पत्र तूं वाचलेंच असशील. त्यांना अेकदम अेवढा अहिंसेचा पुळका कशाने आला ? गांधीसारख्या कट्टया अहिंसावाल्याने देखील अन्नाची टंचाअी असली तर मासे खावे असें सांगितलें

आहे. मग सावरकरांनी वाईट काय सांगितलें? शिवाय शाकाहार हा आमचा ब्राह्मणांचा नव्हे, जैनांचा आहे. हा वैदिक धर्म नव्हे आणि वेदप्रामाण्यावर भर देणाऱ्या ब्राह्मणांनी तरी मांसाहाराला हरकत घेऊं नये. आमचे प्राचीन ऋषि गोमांस देखील खात होते, मग माट्यांनी असें कां लिहावें? त्यांना नको असेल तर त्यांनी खाऊं नये, त्यांना कोणी सक्ती करीत नाही. ते म्हणतात की याने दुही वाढेल, पण हें साफ खोटें आहे. ब्राह्मणांत आणि अितर जातींत विरोध वाढायला मांसाहार हें अेक मोठें कारण आहे. येथल्या ब्राह्मणसभेला सारस्वत ब्राह्मण चालत नाहीत, याला ते मांसाहाराचेंच कारण सांगतात. वास्तविक जातिनिमूर्लनसंस्थेने मांसाहाराचा प्रचार सुरू केला पाहिजे. ते म्हणतात जातीजातींत रोटी-बेटी व्यवहाराला हरकत असूं नये, पण ज्यांचा आहार वेगळा असेल, अशा जातींत हे व्यवहार व्हावे कसे? जैनांना शरण गेलेल्या माट्यांसारख्या ब्राम्हणांनी मांसाहार सोडून दिला होता, पण हल्ली पुष्कळ ब्राम्हण मांसाहार करतात. तरी देखील रोटीव्यवहार जर सर्रास चालू व्हायला पाहिजे असेल, तर मांसाहार सुरू केल्याशिवाय तो अशक्य आहे. शिवाय अन्नाच्या तुटीचा प्रश्न जरी सोडून दिला, तरी आहारशास्त्राच्या दृष्टीने मिश्र आहारच सर्वांत श्रेष्ठ आहे यांत शंका नाही. अर्थात् कांही शाकाहारी धार्मिक डाक्तर याला विरोध करतील, पण म्हणून कांही तें खोटें ठरत नाही. मरतुकडीं गुरें जगवण्याकरतां चांगल्या गुरांचे हल्ली जे हाल होतात, तेही मग होणार नाहीत. जैन कांही म्हणोत, निदान ब्राम्हणांनी तरी मांसाहाराला विरोध करूं नये. माटे कधीकधी कांहीतरी विलक्षण लिहीत असतात. मांसाहाराविरुद्ध लिहिणारे लोक विचारच करीत नाहीत. मांसाहार ब्राम्हणांशिवाय आणि जैनांशिवाय सगळे लोक करीत असतांना देखील अन्न अपुरें पडतें, तेव्हां सर्वांनी जर शाकाहार करायाचा म्हटला, तर अन्न पुरेल कसें? की अन्नाशिवाय लोक मेले तरी हरकत नाही, पण मांसाहार करूं नये, असें माट्यांना म्हणायचें आहें? तसें असेल तर त्यांनी निदान जैन व्हावें किंवा अगोदरच झाले असले तर तें जाहीर करावें. अेरवीं हा आचरटपणा

सोडून द्यावा.

आतां मुरारजींना निवडून आणायला सरकारला अेक नवीन युक्ति सांपडली आहे. त्यांच्या यशस्वी प्रतिस्पर्ध्यानें आपले हिशोब वेळेवर सादर केले नाहीत म्हणे! अन् उशीर किती, तर दोन दिवस! कायद्याच्या दृष्टीने हा दोष असेल, पण असे कायदे करावेच कां? अधिवेशनापर्यंत हिशोब न आले तर त्यांचें नांव रद्द करावें. हिशोबाची अितकी घाअी कां असते? सरकारला मुरारजी पाहिजे आहेत, अन् ते निवडून येण्याचा हा अेक बिनधोक मार्ग आहे हें खरें. कायदेशीर मार्गाने मुरारजींना निवडून आणतां येत असेल, पण हें लोकशाहीच्या तत्वाच्या विरुद्ध आहे यांत शंका नाही.

नगरसमितीच्या निवडणुकींच्या वेळीं समाजवाद्यांना जी अक्कल सुचली, ती अगोदर सुचली असती तर पूर्वीच्या निवडणुकींत त्यांची अशी फटफजीती झाली नसती. आतां नगरसमितींत ते काय दिवे लावताहेत ते दिसतीलच. पण निदान कांग्रेसचें हुकमी बहुमत नाहीसें झालें ही आनंदाची गोष्ट आहे. आतां त्यांच्या अरेरावीला कांहीतरी आळा बसेल.

पुण्याच्या निवडणुकींत तर कांग्रेसची चांगलीच फजीती झाली. हा चमत्कार कसा झाला कांही कळत नाही. बरेच पक्ष कांग्रेसच्या विरुद्ध असून त्यांनी अेकजुटीने निवडणुकी लढवल्या असें दिसतें, पण ही अेकजूट किती दिवस टिकते तें मात्र पहायचें आहे. वास्तविक नगरसमितींत राजकारण बिलकुल शिरतां कामा नये, कारण शहराचे प्रश्नच वेगळे असतात. पण लोक हट्टाला पेटले म्हणजे काय करतील याचा नियम नसतो. तुझी **शारदा**

---

**आमच्या पुस्तकाचा गौरव** : आमच्या **पॅरिसच्या परी** या पुस्तकाची जाहिरात **केसरीने** नाकारली. **संपादक**

---

**मासिकास मदत** : रु. १०-४-०.

---

**समाजस्वास्थ्य** मासिक दर १४ तारखेला टपालांत पडतें.
वर्गणी रु. ३, व्ही. पी. ने रु. ३–६–०

## आमचेकडे मिळणारा माल

**लॅवट डच कॅप**, रु. ८. **अमेरिकन**, रु. १०. **उभट टोपी**, रु. ११. **कॉट्रॅसेप्टॅलीन** (देशी जेली, मोठी नळी) रु. ३. **कोरोमेक्स जेली** (अमेरिकन, मोठी नळी) रु. ५. **गायनोमिन टॅब्लेट्स्** (संततिनियमनाकरतां) डझनाचे नळीस रु. २॥. **पिशव्या**, ४ आणे, ८ आणे, १० आणे, रु. १. **भोंवऱ्याची पिचकारी**, रु. ७.
**राअिटयूब** (रोगप्रतिबंधक), रु. १–२–०, डझनास रु. १३.

**राइट एजन्सी**, १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

**पॅरिसच्या परी**, दुसरी आवृत्ति विक्रीस तयार, रु. ३. **या पुस्तकाची जाहिरात केसरीने नाकारली आहे.**

Registered No. B 2289.


## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. क्लैब्याची मीमांसा, किंमत रु. ६, ट. ख. ८ आणे
२. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु., ट. ख ८ आणे
३. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], ९ वी आवृत्ति किंमत रु. ४, ट. ख. ८ आणे.
४. संततिनियमन [सचित्र], १० वी आ. १। रु. ट. ख. ७ आ.
५. गुप्त रोगांपासून बचाव, ४ थी आ. रु. १, ट. ख. ७ आणे.
६. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख, भाग २ रा [ वर्षे ४–५–६ ], किं. २–०–०, ट. ख. ८ आ.
७. त्वचेची निगा, किं. ८ आ., ट. ख. ७ आ.
८. गुरुबाजी ( नाटक ), किं. ८ आ., ट. ख. ७ आणे
९. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ८ आ.
१०. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ७ आ.
११. न्यायाचा शोध (नाटक), किं १ रु., ट. ख. ७ आ.
१२. पॅरिसच्या परी ( दुसरी आवृत्ति ) रु. ३

## डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५ आ.
२. मूळव्याध, किं. ४ आ.

## श्री. शकुंतला परांजपेकृत

Three years in Australia, Rs. 3/15. Postage As. 8

राइट एजन्सी, नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, मुंबई नं. ४.


मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई–७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट एजन्सी,
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई–४